PM-USHA या केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत मंजूर निधीच्या प्रमाणात केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांना उपलब्ध करुन देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : रुसायो-२०२६/ई-१६२०८११/ विशि-३**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: २२ एप्रिल, २०२६.

पहा:-

१. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग शासन निर्णय क्र.F.No.१ (२७)/ PFMS/ २०२० दि.१३.०७.२०२३
२. भारत सरकार, शिक्षा मंत्रालय, उच्च शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. F.No. २४-४/ २०२५-U.Policy, दि. ३१ मार्च, २०२६
३. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. राप्रसं/ रुसा/ २०२५-२६/०१, दिनांक ०१ एप्रिल, २०२६
४. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/ प्र.क्र.४०/ अर्थ-३ दि.०९ एप्रिल, २०२६

प्रस्तावना :

PM-USHA या केंद्र पुरस्कृत योजनेकरिता केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के प्रमाणात निधी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानच्या SNA खात्यात कोषागारामार्फत देयक सादर करुन आहरीत करण्यात येत होता. आता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये या योजनेकरीता SNA-SPARSH या प्रणालीद्वारे निधी वितरीत होणार आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये या योजनेसाठी केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये सर्वसाधारण घटक योजनेसाठी रु. ३०,५९,८७,५००/- इतकी Mother Sanction वितरीत केली आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त सर्वसाधारण घटक योजनेसाठीचा केंद्र हिस्सा रु. ३०,५९,८७,५००/- व त्यासमरुप राज्य हिस्सा रु. २०,३९,९१,६६६/- इतकी तरतूद राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांना अर्थसंकल्पिय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (BEAMS) वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

केंद्र शासनाच्या संदर्भाधीन दिनांक ३१ मार्च, २०२६ च्या पत्रान्वये प्राप्त PM-USHA या केंद्र पुरस्कृत योजनेच्या सर्वसाधारण घटक योजनेसाठीच्या केंद्र हिस्साचे अनुदान रु.

३०,५९,८७,५००/- (रुपये तीस कोटी एकोणसाठ लक्ष सत्याऐंशी हजार पाचशे फक्त) व त्यासमरुप राज्य हिस्साचे अनुदान रु. २०,३९,९१,६६६/- (रुपये वीस कोटी एकोणचाळीस लक्ष एक्क्याण्णव हजार सहाशे सहासष्ट फक्त) राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांना (BEAMS) अर्थसंकल्पिय अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीवर वितरित करण्यास राज्य शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. उपरोक्त रु. ३०,५९,८७,५००/- निधी मागणी क्रमांक- डब्ल्यु-२, प्रधानशीर्ष- २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३ - विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०३- शासकीय महाविद्यालये व संस्था, (०७) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (०७) (०१) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहाय्यक अनुदान (६० टक्के केंद्र हिस्सा) (२२०२ आय २६३), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखालील सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून वितरीत करण्यात येत आहे. तर, रु. २०,३९,९१,६६६/- निधी मागणी क्रमांक - डब्ल्यु-२, प्रधानशीर्ष- २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०३- विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०३- शासकीय महाविद्यालये व संस्था, (०७) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (०७) (०२) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहाय्यक अनुदान (४० टक्के राज्य हिस्सा) (२२०२ आय २७२), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून वितरीत करण्यात येत आहे.

३. वरील अनुदानाची सर्व कागदपत्रे व हिशोब महालेखापाल, महाराष्ट्र -१ किंवा प्रकरणपरत्वे महालेखापाल-२, नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून त्यांनी मागणी केल्यास, सर्व कागदपत्रे त्यांचेकडे तपासणी करीता राज्य प्रकल्प संचालक (रुसा) यांनी सादर करावीत.

४. राज्य प्रकल्प संचालक (रुसा) यांना केंद्र शासनाने ज्या प्रयोजनार्थ निधी मंजूर केला आहे त्या निधीचा वापर त्या प्रयोजनासाठी करावा. खरेदी व बांधकामाची मान्यता विद्यापीठ लेखासंहितेनुसार सक्षम प्राधिका-यामार्फत घेण्यात यावी.

५. तसेच, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदी व त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच तद्नंतर वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांनुसार सदरची खरेदीप्रक्रीया विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर पार पाडावी व विहित कालावधीमध्ये सदरचा खर्च पुर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सदरचा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र. ३३६/व्यय-५/दि. २१.०४.२०२६ अन्वये दर्शविलेल्या सहमतीस अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२२१८५५४०५३०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.04.22 18:57:28 +05'30'

**( प्रताप पां. लुबाळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :**

१. मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्रक्षशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) संचालनालय, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा वअनुज्ञेयता) / लेखापरीक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग,(व्यय-५), (अर्थसंकल्प-३/८), मंत्रालय, मुंबई.
९. अवर सचिव (अर्थसंकल्प कक्ष), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.निवड नस्ती (विशि -३), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.